# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
## (महाराष्ट्र शासन अंगिकृत)

P-357001

क्र.मऔविम/प्राअ(मावतं)विभाग/ /२०२४

उद्योग सारथी
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 27 NOV 2024

## परिपत्रक

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानात वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी सह-विकासक (Co-Developer) नेमणेबाबतच्या परिपत्रकास मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/विधी व कामकाज/९४/२००९ दिनांक ११/११/२००९.
२ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/६३४७०/२०१३ दि.२७/०२/२०१३.
३. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/बी३९८५७/२०१५ दि.११/०५/२०१५
४. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी१४८४१/२०१६ दि.२७/०९/२०१६
५ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/२२१००/२०१३ दि.१८/१२/२०१८.
६. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी०९३१८/२०२० दि.२५/११/२०२०.
७. परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/सी-२३०८५ /२०२३ दि.०९/०२/२०२३.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेली घसरण, जागतिक, औद्योगिक तसेच आर्थिक मंदी याचा विचार करता विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र ७ अन्वये सह विकासक (Co-Developer) नेमण्यासाठी विहित केलेला कालावधी संपुष्टात आल्याने व या क्षेत्रातील उद्योजकाकडून सह-विकासक नेमण्यास परवानगी देण्यासंबधाने प्राप्त झालेली निवेदने / प्रस्ताव विचारात घेता, सह-विकासक नेमण्याचा कालावधी वाढविण्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०८/१०/२०२४ रोजी झालेल्या ४०३ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६८९३ पारीत करण्यात आला. सदर ठरावाचे अनुषंगाने विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड विकासासाठी


(For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in)

प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना वाटप केलेल्या भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने सह-विकासक (Co-Developer) ची प्रकरणे गुणवत्ता निहाय तपासून महामंडळाचे उपरोक्त संदर्भिय दि. ११/११/२००९ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर दिनांक ०९/०२/२०२३ च्या परिपत्रकास मा.संचालक मडळाच्या दिनांक ०८/१०/२०२४ रोजीच्या ४०३ व्या बैठकीमधील ठराव क्र ६८९३ नुसार दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२६ असा पुढे दोन वर्ष वाढवणे तसेच सह-विकासक (Co-Developer) मंजूरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई-९३

प्रत :

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन/ मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि /डीएमआयसी / पणन )
४. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
६. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
७. सह /उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई /पुणे /औरंगाबाद /नागपूर.
८. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
९. सर्व औद्योगिक संघटना.
१०. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

(For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in)